## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र. रामाआ/२३१६/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१.

श्रीमती. शरणव्वा खंडाप्पा माळी. अपिलार्थी

**विरुध्द.**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय पुरवठा शाखा, जत, ता.जत, जि. सांगली. उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथातहसिलदार,
तहसिल कार्यालय पुरवठा शाखा, जत, ता.जत, जि. सांगली.

### द्वितीय अपील सुनावणी दिनांक २०/१२/२०२१

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ११/०३/२०१७ | -- | ११/०४/२०१७ | -- |

अपिलार्थी यांनी दि २६/०५/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

प्रस्तुत द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जोडपत्र 'अ' मध्ये जन माहिती अधिकारी यांचे कडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

' B.P.L. पिवळे रेशनकार्ड Y.K.No. २७५७६१ असुन धान्य मिळणेबाबत. '

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'माहिती मिळाली नाही' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक ११/०३/२०१७ रोजीचा असुन तो तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पुरवठा शाखा, ता. जत, जि. सांगली यांचेकडे केलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही, असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते.

२) तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात,

३) अपिलार्थीचे प्रथम अपिल दिनांक ११/०४/२०१७ रोजीचे असुन, तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही, असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते.

४) तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला असल्याने ते शिस्तभंग विषयक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

५) अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना प्रयोजन नमूद केलेले नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पुरवठा शाखा, ता. जत, जि. सांगली यांनी विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुद्ध कलम २० मध्ये नमुद तरतूदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचे विरुद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय पुरवठा शाखा, जत, जि. सांगली यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करून अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि. १२/१२/२००७ व परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४ /प्र.क्र.१५४/०७ /०६ दि. ३१/३/२००८ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये ? याचा लेखी खुलासा १५ दिवसांचे आत आयोगास सादर करावा अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

४) जिल्हाधिकारी, सांगली यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालिन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

1391/2022 सांगली/2316/2017
जावक क्र. दिनांक - 13/6/2022

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित</u>-

जिल्हाधिकारी, सांगली, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/ प्र. क्र. २१९/०८/९(मा. अ.), दि. १०/०६/२००८ मधील सूचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांना (नोंदणीकृत टपालाद्वारे)सदरचा आदेश बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.